प्रेसनोट **दि.०४/११/२०२६**

दक्षिण विभाग सायबर पोलीस ठाणे, गुन्हे शाखा, मुंबई यांनी फिर्यादी यांचे Demat खाते हॅक करून त्यांच्या Demat खात्यामधून शेअर्स विक्री करून त्या बदल्यात कमी किंमतीचे (Peeny Stock) खरेदी करून फसवणूक करणा आरोपीतास अटक केलेबाबत.

दिनांक १०/०८/२०२६ रोजी सकाळी ११.०० वाजे पासुन ते १५.०० वाजेच्या सुमारास कोणतरी अज्ञात इसमाने इंटरनेट साधनाचा वापर करून फिर्यादी यांचे **Demat account** यामध्ये त्यांच्या परवानगी शिवाय प्रवेश करून त्यांचे युजर आयडी व पासवर्ड चा वापर करून त्यांच्या डी मॅट खात्यामधून एकून **4,58,34,579/-** रूपयांचे शेअर्स विक्री करून त्याबदल्यात एकून **1,71,60,032/-** रूपये किंमतीचे **Penny** स्टॉक खरेदी करुन फिर्यादी यांची फसवणुक केली आहे म्हणुन फिर्यादी यांनी दिलेल्या तक्रारी वरून दक्षिण सायबर पोलीस ठाणे गुन्हे शाखा मुंबई येथे गुरक्र ६८/२६ अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे. नमुद गुन्हयामध्ये फिर्यादी यांचे शेअर विक्री केल्यानंतर पोलीसांनी तात्काळ रु. **2,86,74,547/-** किमतीचे शेअर्स गोठविण्यात आले.

नमूद गुन्ह्याच्या तपासा दरम्यान निष्पन्न झाले की फिर्यादी यांच्या डिमॅट अकाउंट मध्ये लॉगिन करण्याकरिता ओटीपी हा फिर्यादी यांच्या ईमेल आयडीवर प्राप्त होत होता. नमूद अटक महिला आरोपिताने फिर्यादी यांचा ई-मेल आयडी चा एक्सेस मिळविण्याकरिता त्याला संलग्न असलेला मोबाईल क्रमांकाचे गैर कायदेशीर रित्या सिमकार्ड प्राप्त करुन त्या आधारे फिर्यादी यांच्या **यांचे Demat खाते मध्ये प्रवेश करुन** फिर्यादी यांच्या परवानगीशिवाय त्यांचे शेअर्स विक्री करुन त्या बदल्यात **penny** स्टॉक खरेदी करून फिर्यादी यांची फसवणूक केली.

नमुद अटक महिला आरोपीस दि ०३/११/२०२६ रोजी अटक करण्यात आली आहे आरोपीचा पुर्व इतिहास पडताळला असता खालील नमुद अशाच प्रकारच्या गुन्हयामध्ये अटक करण्यात आली असल्याचे निष्पन्न झाले.

- सांताक्रुझ पोलीस ठाणे, गु.र.क्र ९५४/२०२५ कलम ३१८(४),३१९(२),३(५) भा.न्या.स. सह कलम ४३,६६,६६(क),६६(ड) मा.तं.अधि.
- सांताक्रुझ पोलीस ठाणे, गु.र.क्र ८०४/२०२५ कलम ३१८(४),३१९(२) भा.न्या.स. सह कलम ६६(क),६६(ड) मा.तं.अधि.
- आझाद मैदान पोलीस ठाणे, गु.र.क्र २५३/२०२५ कलम ३१८(४), ३(५) भा.न्या.स. सह कलम ६६(क),६६(ड) मा.तं.अधि.
- अंधेरी पोलीस ठाणे गु.र.क्र ७०३/२०२६ ३१८(४),३१९(२) भा.न्या.स. सह कलम, ६६(क),६६(ड) मा.तं.अधि.

सदरची प्रशंसनीय कामगिरी मा.पोलीस आयुक्त,बृहन्मुंबई श्री देवेन भारती,मा. पोलीस सह आयुक्त (गुन्हे) श्री अनिल कुंभारे,मा.अपर पोलीस आयुक्त (गुन्हे) श्री.कृष्ण कांत उपाध्याय,मा.पोलीस उप आयुक्त (सायबर गुन्हे) श्री बजरंग बनसोडे, मा.सहायक पोलीस आयुक्त श्री सायरस इराणी, यांच्या मार्गदर्शनाखाली वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री नंदकुमार गोपाळे यांच्या नेतृत्वाखाली पोलीस निरीक्षक फातिमा बागवान ,पोलीस उप निरीक्षक दिपेश शिंदे पोशिक्र २००१०१/अमेय शिंदे व मपोशि ११२६७०/रेश्मा धुमाळ व पथकाने .यांनी यशस्वीरित्या पुर्ण केली

नागरिकांना आवाहन करण्यात येते की, अनोळखी मोबाईल क्रमांकावरुन आलेल्या link / app द्वारे शेअर मार्केटमध्ये व्यवहार करु नयेत. तसेच Demat/Trading खात्यांचे password, OTP, ई.मेल खाते व recovery access कुणालाही सांगू नये. अनोळखी link/app द्वारे शेअर मार्केटमध्ये व्यवहार करु नयेत. संशयास्पद व्यवहार आढळल्यास तात्काळ 1930 हेल्पलाईन किंवा www.cybercrime.gov.in येथे तक्रार नोंदवावी.